**नि.फौ.ख.क्र.१९/२०१८**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ४**

**निशाणी क्र. ३१**

शपथेवर कथन करतो की,

**नांव** – साधना अंकुश पवार

**वय** – ४७ वर्षे **धंदा** – गृहिणी

**राहणार** – कुडाळ, ता. जावली, जि. सातारा

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.४ चा सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती.जे.आर.इंगळे**

१. माझ्यासोबत माझे पती अंकुश, दोन मुले श्रेयश व अमृता हे राहण्यास आहेत. २०१७ साली मी पुणे येथे राहण्यास होते. माझ्या पतीचे वारजे, पुणे येथे स्नॅक्स सेंटर होते. माझे मुळ गाव कुडाळ. मी गावाकडे येवून जावून असते. दि.०७.०३.२०१७ रोजी मी कुडाळ येथे माझ्या मुलांसहीत त्यांना सुट्टी लागल्यामुळे आले होते. सांजवात शिक्षण संस्था मतिमंद शाळेशेजारी आमचे घर आहे. दि.०७.०३.२०१७ रोजी वर्षा कांबळे व मंगल कांबळे या दोघी आमच्या घरी आल्या होत्या. त्या दोघी मतिमंद शाळेतील शिक्षिका होत्या. त्यांनी मला तुम्ही काय काम करता असे विचारले असता मी घरीच असते असे सांगितले. तसेच मुलगा काय करतो असे विचारले असता त्याची १२वीची परिक्षा झाली असे मी सांगितले. त्यांनी सांगितले की, त्यांच्या ओळखीचे नातेवाईक विजय अर्जून नलावडे हे आय.डी.बी.आय. बँकेत डी.ओ. या पदावर कार्यरत आहेत. त्यानंतर त्या म्हणाल्या की, तुमच्या मुलाची ट्रेनिंग फी साठ हजार रुपये भरुन तुम्हाला आम्ही कामाची हमी देतो, जर काम नाही झाले तर आम्ही पैसे परत देऊ. आय.डी.बी.आय. बँकेत क्लर्क पदाचे काम होते. मी दि.०७.०३.२०१७ रोजी मी विचार करुन सांगते असे सांगितले. मी पुण्याला निघून गेले. त्यानंतर दि.०१.०५.२०१७ रोजी मी पुन्हा गावी आले. मंगल कांबळे व वर्षा कांबळे या पुन्हा घरी आल्या. त्यावेळी त्यांनी पुन्हा तेच सांगितले. त्यामुळे मी दि.०२.०५.२०१७ रोजी मंगल कांबळे व वर्षा कांबळे यांना रक्कम रु.६०,०००/– रोख स्वरुपात दिले. त्याबाबत माझ्याकडे काही पुरावा नाही. त्या शिक्षीका असल्यामुळे मी त्यांच्यावर विश्वास ठेवून पैसे दिले. तसेच शाळेचे डॉक्युमेंट, माझे आधार कार्ड

व माझे चार फोटो दिले. दि.२०.०५.२०१७ रोजी बी.के.सी. सेंटर, बांद्रा मुंबई येथे परीक्षा होईल असे सांगितले. दि.१७.०५.२०१७ रोजी तुम्हाला मोबाईलवर हॉल तिकीटचा मेसेज व दि.१८.०५.२०१७ रोजी पोस्टाने हॉलतिकीट घरी येईल असे सांगितले. त्यानंतर १७.०५.२०१७ व १८.०५.२०१७ रोजी मेसेज अथवा हॉलतिकीट आले नाही म्हणून मी वर्षा कांबळे यांना दि.१९.०५.२०१७ रोजी फोन केला व हॉलतिकीट का आले नाही असे विचारले असता त्यांनी दि.२०.०५.२०१७ रोजी परीक्षा केंद्रावर हॉलतिकीट मिळणार आहे असे सांगितले. त्यानंतर मी व आमच्या गावातील २०-२५ लोकं मुंबईला जायला निघालो. आम्ही मुंबईला बी.के.सी.सेंटर, बांद्रा येथे सकाळी ९ वाजता पोहोचलो. तिथं पोहोचल्यावर बँकेतील डी.ओ. साहेब बाहेर आले. त्यांना मी विचारले आज परीक्षा आहे का. त्यांनी सांगितले की आज बँकेची कसलीही परीक्षा नाही व विजय अर्जून नलावडे हे येथे कामाला नाहीत. त्यानंतर आम्हाला कळाले की, आमची फसवणुक झालेली आहे. त्यावेळी आमच्यासोबत वर्षा कांबळे व मंगल कांबळे होत्या. त्या म्हणाल्या की, आमची मंत्रालयात ओळख आहे, तेथे तपास करतो काय आहे ते. त्यानंतर आम्ही सर्व घरी आलो. नंतर आम्ही २०-२५ जण कुडाळ पोलीस स्टेशनला गेलो. तेथे त्यांनी आमची तक्रार घेतली नाही. त्यामुळे आम्ही सगळे मेढा पोलीस स्टेशन येथे आलो. तिथं आम्ही आशा लिंबराज कराड यांच्या नांवे सार्वजनिक तक्रार नोंदवली. ती तक्रार दि.०६.०६.२०१७ रोजी नोंदवली. पोलीसांनी तक्रार घेण्यास टाळाटाळ केल्यामुळे तक्रार देण्यास उशीर झाला. पोलीसांनी माझ्याकडे चौकशी केली होती. विजय अर्जून नलवडे यांच्याशी माझी ओळख वर्षा कांबळे व मंगल कांबळे यांनी त्यांच्याकडे पैसे दिल्यानंतर ५ ते ६ दिवसांनी करुन दिली होती. सर्व आरोपींना पाहिल्यास ओळखू शकते. आजरोजी कोर्टात वर्षा कांबळे व मंगल कांबळे हजर आहेत.

**सरतपास पूर्ण.**

**प्रथम सत्राची वेळ संपल्यामुळे उलटतपास द्वितीय सत्रापर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Sd/-

**ठिकाण** : मेढा
रविंद्र भ. खवले,

**दिनांक** : २९.०४.२०२४
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मेढा.**

## आरोपीतर्फे विधीज्ञ श्रीमती.पी.डी.गोरे यांचेमार्फत उलटतपास शपथेवर सुरु

२. माझे शिक्षण १२वी पास झालेले आहे. मला मराठी इंग्रजी लिहिता वाचता येते. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्याही नोकर भरतीसाठी पेपरच्या माध्यमातून जाहिरात दिली जाते. हे म्हणणे खरे आहे की, जाहिरातीमध्ये अटी व शर्ती नमूद केलेल्या असतात. सन २०१७ साली माझे वय ३७ होते. हे म्हणणे खरे आहे की, मी खुल्या वर्गात मोडते. खुल्या वर्गासाठी वयाची अट ३५ वर्ष होती हे मला माहिती नव्हते. माझा जबाब माझ्या सांगण्याप्रमाणे पोलीसांनी टंकलिखित केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या नावाने रु.६०,०००/– आरोपींना दिले. हे म्हणणे खरे नाही की, ते रु.६०,०००/– मी माझ्या नोकरीसाठी भरलेले आहेत. साक्षीदार सांगतो की, मी माझ्या मुलासाठी भरलेले आहेत.

प्रश्न – दि.०७.०३.२०१७ रोजी मंगल कांबळे व वर्षा कांबळे तुमच्याकडे किती वाजता आल्या हे तुम्हाला सांगता येईल का ?

उत्तर – सकाळी १०:३० ते ११ च्या दरम्यान आल्या होत्या.

प्रश्न – दि.०२.०५.२०१७ रोजी पुन्हा मंगल कांबळे व वर्षा कांबळे तुमच्याकडे किती वाजता आल्या हे तुम्हाला सांगता येईल का ?

उत्तर – सकाळी १०:३० ते ११ च्या दरम्यान आल्या होत्या.

आरोपींची कार्यालयीन वेळ मला माहिती नाही. आम्ही मुंबईला खाजगी वाहनाने गेलो. आम्ही ज्या खाजगी वाहनाने गेलो त्याचा नंबर मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमचे घर ते कुडाळ पोलीस स्टेशन हे १० मिनीटांच्या अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमचे घर ते मेढा पोलीस स्टेशन हे मोटारसायकलपे अर्धा तासाच्या अंतरावर आहे. पोलीसांनी तक्रार घेतली नाही म्हणून त्यांच्या वरिष्ठांना कळवले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, कोणाला पैसे दिल्यास आपण पोहोच घेतो. हे म्हणणे खरे आहे की, तसेच कागदपत्र दिल्याचीदेखील पोहोच घेतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींना साठ हजार रुपये दिल्याबाबत लेखी काही घेतले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही बी.के.सी. सेंटर, मुंबई येथे लेखी तक्रार दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी साठ हजार रुपये विजय नलावडे यांना दिले. हे म्हणणे खरे नाही की, आमचा व्यवहार हा आरोपी क्र.१ विजय नलावडे याचेशी झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ मिळून येत नसल्याने आम्ही आरोपी क्र.२ व ३ यांचेविरुध्द तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात जो मजकूर सांगितला आहे तो खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी आशा कराड यांना ओळखते. हे म्हणणे खरे नाही की, ते परिचयाचे असल्यामुळे त्यांच्या फिर्यादीला पुष्टी मिळावी

म्हणून मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Sd/-

**ठिकाण** : मेढा

रविंद्र भ. खवले,

**दिनांक** : २९.०४.२०२४

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मेढा.**